# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

दुरध्वनीक्र. ०७१३२-२२३१०४ email:-gondwanaesst@gmail.com


जा.क्र. गो.वि./आस्था./ ५५९ /२०१८ दि. २३/०२/२०१८

## परिपत्रक

विषय - महाराष्ट्र शासनाची कार्यालये, निमशासकीय कार्यालये, उपक्रमे व महामंडळाच्या विविध कार्यालयीन इमारतींमध्ये तसेच वाणिज्यिक, शैक्षणिक व इतर परिवास्तुंत आपातकालीन परिस्थिती उदभवल्यास करावयाच्या उपाययोजना आणि प्रतिबंधात्मक उपाय करणेबाबत.

संदर्भ - मा. शरद यादव, माहितीचा अधिकार कार्यकर्ता यांचे पत्र दिनांक ०९/०२/२०१८ अन्वये

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये, विद्यापीठ व विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्यांना कळविण्यात येते, महाराष्ट्र शासनाच्या मुंबई स्थित मुख्यालय असलेल्या मंत्रालयात लागलेल्या भीषण आगीत झालेली जीवीतहानी तसेच अधिक प्रमाणात महत्वाच्या नस्त्या/कागदपत्र/अभिलेख/संगणकीय साहित्य जळुन भस्मसात झाल्याने झालेली वित्तहानी लक्षात घेता, अशा प्रकारची भीषण आग भविष्यात लागु नये व आग लागण्याचा प्रकार घडल्यास कोणत्याही प्रकारची जीवीतहानी अथवा वित्तहानी होऊ नये यासाठी आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजनांची कायमस्वरूपी संरचनात्मक आखणी तातडीने करण्याची आजमितीला तरी गरजेची आहे. याशिवाय नैसर्गिक आपत्ती उदभवल्यास कोणकोणत्या पध्दतींचा तात्काळ वापर करून त्यावर नियंत्रण करता येईल अशा उपाययोजनाही करणे आवश्यक असल्याने महराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ मधील तरतुदींचे व नियम २००९ अंतर्गत सुचनांचे काटेकोरपणे अनुपालन करावे तसेच संदर्भीय पत्राचे अवलोकन करून आपल्या स्तरावर कार्यवाही घ्यावी.

(डॉ. ईश्वर मोहुर्ले)
कुलसचिव(प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

सहपत्र - उपरोक्तप्रमाणे संलग्नित.

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-

१) मा. कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीकरीता अग्रेषीत.
२) मा. प्र-कुलगुरुंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीकरीता अग्रेषीत.
३) मा. प्राचार्य, प्रस्तृत महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
४) सर्व विभागप्रमुख, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
सदरहु परिपत्रक विभागातील सर्व कर्मचाऱ्यांना निदर्शनास आणुन द्यावे व यानुसार अवलंब करण्यात यावा.

F:\BBDD\LATTER\Circular\200

# शरद यादव
माहितीचा अधिकार कार्यकर्ता

४४ बी-५०६, गोल्डन सॅन्डस, गोराई - २,
बोरीवली (प.), मुंबई - ४०० ०९१.
भ्रमणध्वनी - ९२२४२५८८४९ ✆ ७२०८४१२९५३
संगणकडाक - sharadyadav1star@gmail.com

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. 1642 दि. 20/2/18

मा. कुलसाचिव,
गोंडवाना विद्यापीठ.

दिनांक : ०५/०२/२०१८

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
आस्थापना विभाग
आवक क्र. 802 दि. 21.2.18
जावक क्र. ........ दि. ........

विषय :- **महाराष्ट्र शासनाची कार्यालये, निमशासकीय कार्यालये, उपक्रमे व महामंडळाच्या विविध कार्यालयीन इमारतींमध्ये तसेच वाणिज्यिक, शैक्षणिक व इतर परिवास्तूंत आपातकालीन परिस्थिती उद्भवल्यास करावयाच्या उपाययोजना आणि प्रतिबंधात्मक उपाय करणेबाबत.**

महाराष्ट्र शासनाच्या मुंबई स्थित मुख्यालय असलेल्या मंत्रालयात दि. २१ जून २०१२ रोजी लागलेल्या भीषण आगीत झालेली जीवीतहानी तसेच अधिक प्रमाणात महत्वाच्या नस्त्या/कागदपत्रे/अभिलेख/संगणकीय साहित्य जळून भस्मसात झाल्याने झालेली वित्तहानी लक्षात घेता, अशा प्रकारची भीषण आग भविष्यात लागू नये व आग लागण्याचा प्रकार घडल्यास कोणत्याही प्रकारची जीवीतहानी अथवा वित्तहानी होऊ नये यासाठी आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजनांची कायमस्वरुपी संरचनात्मक आखणी तातडीने करण्याची आजमितीला तरी गरजेची आहे. याशिवाय नैसर्गिक आपत्ती उद्भवल्यास कोणकोणत्या पध्दतींचा तात्काळ वापर करुन त्यावर नियंत्रण करता येईल अशा उपाययोजनाही करणे आवश्यक आहे.

१. कार्यालयांत कागदपत्रे, लाकडी फर्निचर इत्यांदिंचा वापर मोठ्या प्रमाणात असल्याने तसेच ज्वलनशील असल्याने आग जलदगतीने वाढण्याची शक्यता असल्याने कार्यालयांत आवश्यक त्या ठिकाणी 'FIRE EXTINGUISHER' उपकरणे लावण्यात यावीत. अशा उपकरणांचा वापर करणेबाबत तसेच सदर उपकरणे व्यवस्थितरित्या हाताळणेबाबत संबंधित कर्मचाऱ्यांस वेळोवेळी प्रशिक्षण देण्यात यावे.

२. शक्य तितक्या कागदी वस्तुंचा वापर टाळून संगणक प्रणालीचा उपयोग व्हावा तसेच अनावश्यक ज्वलनशील लाकडी वस्तूंची विल्हेवाट लावण्यात यावी.

Dr. Dwke
AR (Estt)
For necessary Action

३. विविध ठिकाणी 'Smoke detection system' प्रस्थावित करावी व ती व्यवस्थित कार्यान्वित असल्याची दक्षता घ्यावी त्या संबंधित 'Manual Call Point'चा वापर कसा व केव्हा करावा याबाबतचे प्रशिक्षण कार्यालयातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना वेळोवेळी देण्यात यावे. तसेच

17/2/2018

AM. वाळके 21/2

त्यासाठी आवश्यक असणारा 'Emergency Control Room' सुरक्षा रक्षक चौकीच्या सभोवताली स्वतंत्र असा उभारण्यात यावा.

४. प्रत्येक तांत्रिक कामाकरीता एक विशिष्ट 'Standard Operating Procedure' (आदर्श व्यवस्थापकीय कार्यप्रणाली) असणे आवश्यक आहे. जेणेकरुन संभाव्य उद्‌भवणारा धोका टळण्यास मदत होईल.

५. कार्यालयात विशेष ठिकाणी 'Emergency Escape Route Plan' प्रदर्शित करावा. त्यात 'Emergency Exit' दर्शविणे देखील तितकेच महत्वाचे मानून अंधारातही चमकणाऱ्या Radium दिशादर्शकाने बाहेर जाण्याचा मार्ग दर्शविण्यात यावा. जेणेकरुन आपतकालीन परिस्थितीत कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी / अभ्यागत यांना सुरक्षितरित्या तात्काळ बाहेर जाता येईल.

६. उपहारगृह असल्यास उपहागृहाकरीता निकडीच्या प्रसंगी वेगळा दरवाजा असावा (Emergency Door) ज्वलनशील वस्तूंची (Gas Cylinder/ Gas Pipes) योग्य ती सुरक्षा घेण्याचे उपहारगृह व्यवस्थापकाला अनिवार्य करण्यात यावे तसेच त्या वस्तूंच्या तपासणी अहवाल दरमहा कार्यालय प्रमुखांनी घ्यावा.

७. कार्यालयात अथवा कार्यालयाच्या आवारात आगपेटी, सिगारेट, लाईटर्स तसेच ज्वलनशील पदार्थ आणण्यास सक्त मनाई असावी. कर्तव्यावर असणाऱ्या सुरक्षा रक्षकांकडून योग्य ती तपासणी नियमीत व्हावी. अशा वस्तू संबंधितांकडे सापडल्यास दंडात्मक कार्यवाही करणेबाबतचे फलक सुस्पष्ट दिसतील अशा ठिकाणी लावण्यात यावेत.

८. कार्यालयांत असणाऱ्या ठेवणावळ (Storage) कक्षामध्ये जे साहित्य असेल त्याची यादी प्रदर्शित करावी. त्या यादींची प्रत कर्तव्यावर असणाऱ्या सुरक्षा रक्षकांकडे तसेच संबंधीत जबाबदार विभागाकडे उपलब्ध असावी.

९. कार्यालय तसेच कार्यालयाच्या आवारात Emergency Light आवश्यक असून त्यांची वेळोवेळी चाचणी (Periodical Checking) विद्युत विभागाकडून करण्यात यावी.

१०. कार्यालयाच्या आवारामध्ये (Corridor) कोणत्याही प्रकारचा अडथळा होू नये याची दक्षता घ्यावी. जेणेकरुन आपातकालीन परिस्थितीत मदत कार्यात अडथळा निर्माण होणार नाही.

११. कार्यालयातील विद्युत केबलची व्यवस्थित बांधणी असावी. विद्युततारा लटकत्या अथवा खुल्या असुन नयेत. विद्युत तारांचे आवरण 'Fire Protection' चे असावेत. विद्युततारांच्या जोडणीचा आराखडा विद्युत विभागाकडे तसेच संबंधित विभागाकडे असणे गरजेचे आहे जेणेकरुन शॉर्टसर्किट झाल्यास तात्काळ उलगडा होऊन आग आटोक्यात आणणे सोपे होईल.

१२. अतिदाबाच्या विद्युत प्रवाहाचे वहन (Overload) होऊ नये यासाठी Overload Relay त्वरीत बसविण्यात यावेत.

१३. कार्यालयांत तसेच कार्यालयाच्या आवारात Full Fledged Fire Hydrant System, Water Sprinkler System आणि Risers बसविणे गरजेचे आहे.

१४. प्रत्येक कार्यालयाने खात्यांतर्गत Fire Rescue Team तयार करुन त्याबाबतचे प्रशिक्षण त्या टीममधील अधिकारी / कर्मचाऱ्यांना देण्यात यावे.

१५. वादळ, पूर अथवा भूकंप यासारखी नैसर्गित आपत्ती उद्भवल्यास तातडीने सुरक्षित ठिकाणी जाणे योग्य होईल. याबाबत संबंधित प्रमुखांनी अशा उपाय योजनांबाबत संबंधित विभागांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत कार्यशाळा वेळोवेळी आयोजित कराव्यात.

टिप :-

१. महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ मधील तरतूदींचे व नियम २००९ अंतर्गत सूचनांचे काटेकोरपणे अनुपालन व्हावे.

२. महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालयाचे दि. १८ जुलै, २०१२ चे कार्यालयीन आदेशांमधील निर्देशित सूचनांनूसार कार्यवाही व्हावी.

आपला कृपाभिलाषी,

(शरद यादव)